# स्वच्छ भारत अभियान

# स्वच्छ महाराष्ट्र स्वास्थ महाराष्ट्र

## चंद्रपूर जिल्ह्यातील जिवती तालुक्यातील
## अमरावती जिल्ह्यातील धारणी आणि चिखलदरा तालुक्यातील
## आदिवासी समुदायाची जीवनशैली व आरोग्य /पोषण
## /उपजिविका संसाधन सद्यस्थिती अभ्यास
## तालुकास्तरीय प्रशिक्षण कार्यशाळा
## वाचन साहित्य

## सोस्वा ट्रेनिंग ॲण्ड प्रमोशन इन्स्टिटयूट (स्टापी)

म्हाडा कमर्शियल कॉम्प्लेक्स, पहिला मजला
महाराष्ट्र हौसिंग बोर्ड कॉलनी
सैनिक सातारा सहकारी बँकेशेजारी व महाऊर्जा जवळ
येरवडा, पुणे - ४११००६

दूरध्वनी क्र. : ०२०-२६६९६२१२/२६६८७९००/२६६८४६४१

ई-मेल आयडी : stapipune@gmail.com
संकेतस्थळ/वेबसाईट : www.stapi.org

| स्वच्छ महाराष्ट्र स्वास्थ महाराष्ट्र चंद्रपूर जिल्ह्यातील जिवती तालुक्यातील अमरावती जिल्ह्यातील धारणी आणि चिखलदरा तालुक्यातील आदिवासी समुदायाची जीवनशैली व आरोग्य /पोषण /उपजिविका संसाधन सद्यस्थिती अभ्यास | | |
|---|---|---|
| **तालुका जिवती जिल्हा चंद्रपुर** | **तालुका धारणी जिल्हा अमरावती** | **तालुका चिखलदरा जिल्हा अमरावती** |
| **पाटण प्राथमिकआरोग्य केंद अंतर्गत गावे**<br>• चिखलीगुडा<br>• पाटागुडा<br>• सितागुडा<br>• जनकापुर कोलाम<br>• आनंदगुडा<br>• घोडणकप्पी<br>• माथाडी गौडगुडा<br>• तुमरी गुडा<br>• काकबन | **बिजुधावडी प्राथमिकआरोग्य केंद अंतर्गत गावे**<br>• तातरा<br>• भांडुम<br>• गडगामालूर<br>• झिलांगपाटी | **सिमाडोह प्राथमिक आरोग्य केंद अंतर्गत गावे**<br>• रेहट्याखेडा<br>• बोराटा खेडा<br>• रायपुर<br>• माखला<br>• बिच्छूखेडा<br>• चुनखडी<br>• नवलगाव |
| **जिवती प्राथमिक आरोग्य केंद अंतर्गत गावे**<br>• मरकांगोदी<br>• सिंगारपठार<br>• कारगाव<br>• पाटागुडा<br>• जांभुळधरा<br>• धनकदेवी<br>• रायपुर<br>• खडकी<br>• घाटराईगुडा | **कळमखार प्राथमिकआरोग्य केंद अंतर्गत गावे**<br>• दाठीया<br>• चिचघाट<br>• मोरवा<br>• सोनाबर्डी<br>• दहींडा<br>• गौलखेडा | |





## ***पंचायत क्षेत्र विस्तार कायदा १९९६ (पेसा)***

*आपल्या देशातील अनुसूचित क्षेत्रातील गावांना पंचायत क्षेत्र विस्तार कायदा १९९६ ने स्वयंशासनाचा अधिकार दिला आहे. या कायद्यामध्ये आदिवासींच्या जीवनामध्ये खूप मोठा बदल घडवून आणण्याची क्षमता आहे. या कायद्याला पूरक ठरतील असे कायदे करणे किंवा आहे त्या कायद्यामध्ये बदल करणे असा प्रयत्न शासन सतत करीत आहे.*

*महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मध्ये सुधारणा करुन अनुसूचित क्षेत्रातील ग्रामसभेला फार मोठे अधिकार दिले आहेत. आपण सर्वांनी ग्रामसभेच्या अधिकाराची व जबाबदारीची माहिती घेवून आदिवासी विकासाच्या प्रक्रियेमध्ये आपला सहभाग देण्याची नितांत गरज आहे. ह्या कायद्याची माहिती आदिवासींना व संबंधित ग्रामस्तरावरील यंत्रणेला झाल्यास ह्या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी होण्यास मदत होईल.*

*'पेसा' कायद्याला पंचायत क्षेत्र विस्तार कायदा १९९६ किंवा* Panchayat Extension to Scheduled Areas Act (PESA) 1996 *ह्या नावाने संबोधले जाते. ह्या कायद्याचा अंमल २४ डिसेंबर १९९६ पासून सुरु झाला. भारताच्या मा. राष्ट्रपतींनी अनुसूचित क्षेत्रामध्ये समाविष्ट केलेल्या गावांना हा कायदा लागू आहे. भारताच्या मा. राष्ट्रपतीना एखादे गाव अनुसूचित क्षेत्रात समाविष्ट करण्याचा किंवा वगळण्याचा अधिकार आहे. हा कायदा आंध्रप्रदेश, छत्तीसगड, राजस्थान, गुजरात, हिमाचलप्रदेश, झारखंड, मध्यप्रदेश, महाराष्ट्र, ओरिसा ह्या राज्यांना लागू होतो.*

*ह्या कायद्यांतर्गत महाराष्ट्रातील ठाणे, पालघर, नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, अहमदनगर, गडचिरोली, चंद्रपूर, नांदेड, यवतमाळ, पुणे, अमरावती अशा एकूण १३ जिल्ह्यांचा समावेश होतो. हा कायदा अनुसूचित क्षेत्रातील आदिवासी लोकांशी संबंधित आहे.*

### ***पेसा कायद्याचे प्रमुख सूत्र :***

*आदिवासींची संस्कृती, प्रथा-परंपरा यांचे जतन संवर्धन करणे व ग्रामसभेच्या माध्यमातून आदिवासींची स्वशासन व्यवस्था बळकट करणे.*

*महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, कलम ४ नुसार जाहीर केलेले गाव महसूल गाव म्हणून ग्राह्य धरले जाते. परंतू पेसा कायद्याप्रमाणे समान रुढी, परंपरा पाळणाऱ्या लोकांचे गाव, किंवा वस्त्या, पाडे किंवा वस्त्यांचा समुह गाव ह्याला म्हणून संबोधले जाते. ज्याचे नाव गावाच्या मतदार यादीमध्ये समाविष्ट आहे त्याला ग्रामसभेला उपस्थित राहून कामकाजामध्ये सहभाग घेण्याचा अधिकार आहे.*

### ***पेसा अंतर्गत आदिवासी गावांची विशिष्ट ओळख /व्याख्या:***

*शासनाला एखादे गाव, वस्ती, किंवा वस्त्यांचा समूह ह्याचे क्षेत्र लक्षात घेवून ते क्षेत्र महसूली गाव म्हणून जाहीर करण्याचा अधिकार आहे. परंतू, पेसा कायद्यांतर्गत गाव म्हणजे समान रुढी, प्रथा, परंपरा, असलेल्या लोकांचे गाव, वस्ती, पाड्यांच्या समुह गाव म्हणून गृहीत धरले जाते. त्यामुळे महसूली गाव व आदिवासी गाव सारखेच असेल असे नाही.*

### ***अनुसूचित क्षेत्रातील सरपंच व ग्रामसेवक ह्यांनी घ्यावयाची दक्षता***

- *वरिष्ठ कार्यालयाशी संपर्क साधून आपल्या गावाचा समावेश अनुसूचित क्षेत्रात असल्याची खात्री करावी.*
- *आपल्या गावाचा समावेश अनुसूचित क्षेत्रात असल्याची माहिती सर्वांना द्यावी.*
- *अनुसूचित क्षेत्रातील ग्रामसभेला व पंचायतीला प्राप्त झालेल्या अधिकाराची व जबाबदारीची माहिती सर्व ग्रामस्थांना द्यावी.*
- *महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमानुसार ग्रामसभेचे कामकाज चालविले जाईल, याची दक्षता घ्यावी.*

- *ग्रामसभा खुल्या, शांततामय व निर्भय वातावरणामध्ये पार पाडल्या जातील व ग्रामसभेतून दुर्बल घटकांना न्याय मिळेल यासाठी विशेष दक्षता घ्यावी.*
- *ग्रामसभेवर सर्वांचा विश्वास वृध्दींगत होईल ह्यासाठी वातावरण निर्मिती करावी.*

***पेसा कायद्याअंतर्गत ग्रामसभांचे अधिकार:***

***सामाजिक हित:आदिवासी*** *रुढी,* ***प्रथा व परंपरा*** *व सांस्कृतिक ओळख ह्यांचे जतन व संवर्धन करण्याचा, तसेच सामुहिक मालमत्तेचे व्यवस्थापन करण्याचा आणि आपापसातील तंटे मिटवण्याचा अधिकार ग्रामसभेला देण्यात आला आहे.*

***आरक्षण:****पेसा कायद्याने आदिवासींना पंचायतराज संस्थांमध्ये लोकसंख्येच्या प्रमाणात, परंतू निम्म्यापेक्षा कमी नाही इतके लोकप्रतिनिधी पदांचे आरक्षण देण्यात आले आहे.*

***जमीन सुरक्षा :*** *आदिवासींच्या खाजगी मालकीच्या जमिनीचे बिगर आदिवासींकडे होणाऱ्या हस्तांतरणावर निर्बंध लादण्याचा अधिकार ग्रामसभेस आहे. बेकायदेशीर हस्तांतरित झालेल्या जमिनीचे आदिवासींकडे पुर्नस्थापन करण्याबाबत मूळ आदिवासीला ती जमीन परत करण्याचा ठराव पारीत करुन पुढील कार्यवाहीसाठी जिल्हाधिकाऱ्याकडे पाठविला जातो.*

***भुमिसंपादन व पुनर्वसन :*** *जमिनीचे संपादन व विस्थापितांचे पुनर्वसन करण्यापूर्वी ग्रामसभेचा सल्ला घेणे अनिवार्य.*

***गौण वनउपज :*** *गावाच्या वहिवाटीखालील वनक्षेत्रात मिळणाऱ्या गौण वनौपजेची मालकी गावाची असेल गौणवनउपजेचे व्यवस्थापन करण्याचा ग्रामसभेला अधिकार असल्याने आपला व आपल्या गावाचा व जंगलांचा विकास साधण्यासाठी ग्रामसभेला उपस्थिती आवश्यक .*

***लघु जलसाठे :****ज्या पाणीसाठ्याची सिंचन क्षमता १०० हे. पर्यंत असते. त्याला लघूपाणीसाठे म्हणतात.अनुसूचित क्षेत्रातील अशा १०० हेक्टरपर्यंत सिंचन क्षमता असलेले लघूपाणीसाठ्यांचे नियोजन व व्यवस्थापन ग्रामपंचायतीच्या नियंत्रणा खाली असते.ह्याबाबत ग्रामसभेच्या निर्णयान्वये ग्रामपंचायतीला कामकाज करावे लागते.*

***गौण खनिजे :*** *अनुसूचित क्षेत्रातील गौण खनिजांचा लिलाव, भाडे पट्टा देण्यापूर्वी ग्रामसभेची मान्यताव पंचायतीची पूर्वसंमती घेणे बंधनकारक आहे. या अधिकारांचा वापर करुन पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी ग्रामसभेला जाणे आवश्यक.*

***बाजार व सावकारी :***
*बाजाराचे व सावकारी धंद्यांचे नियमन करण्याचा ग्रामसभेला अधिकार आहे. अनुसूचित क्षेत्रातील बाजाराचे व्यवस्थापन व सावकारी धंदे ग्रामसभेच्या नियंत्रणाखाली असतात. सावकारीचा परवाना ग्रामसभेच्या शिफारसीने देण्यात येतो. ह्या अधिकारांचा वापर करुन आदिवासींच्या हितांचे रक्षण करण्यासाठी ग्रामसभेला उपस्थिती आवश्यक .*

***गाव विकास :*** *गावविकास आराखड्यांला, विकास प्रकल्पाला/ योजनेला मंजूरी देण्याचा व शासकीय विकास योजनांचा प्राधान्यक्रम निश्चित करण्याचा व विकास योजनांसाठी लाभार्थी निवडण्याचा अधिकार ग्रामसभेला आहे.पंचायतीने केलेल्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र ग्रामसभा देते.*

***आर्थिक व्यवस्थापन :*** *गावविकासासाठी येणाऱ्या निधीवर ग्रामसभेचे नियंत्रण असतो. पंचायतीने केलेल्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र देण्याचा अधिकार ग्रामसभेस असतो.*

***अंमली पदार्थाचे नियमन :****अंमलीपदार्थांच्या विक्रीवर निर्बंध घालण्याचा किंवा अंमली पदार्थाच्या सेवनाचे नियमन करण्याचा अधिकार ग्रामसभेला आहे. ह्या अधिकाराचा वापर करुन गावात शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी ग्रामसभेला जाणे आवश्यक.*

***शासकीय कार्यालयावर नियंत्रण :*** *आदिवासी विकासाशी निगडीत व सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या शासकीय कार्यालये व खाजगी संस्थावर ग्रामसभेचे नियंत्रण असते.*

***ग्रामसभा व्यवस्थापन :***

*अनुसुचित क्षेत्रातील ग्रामसभेला मोठे अधिकार प्राप्त झाल्याने तिचे कामकाज कायद्याच्या तरतूदीशी सुसंगत व परिणामकारक करण्याची दक्षता आदिवासी व शासकीय आधिकाऱ्यांनी घेणे अत्यंत महत्वाचे आहे. अनुसूचित क्षेत्रातील ग्रामसभेस अनुसूचीत क्षेत्राबाहेरील ग्रामसभेपेक्षा म.ग्रा.पं. अधिनियम १९५८, कलम ५४ ने विशेष अधिकार देण्यात आले आहेत.*

- *अनुसूचित क्षेत्रातील व अनुसूचित क्षेत्राबाहेरील ग्रामपंचायतीच्या वर्षातून किमान ४ ग्रामसभा घेणे बंधनकारक आहे.*
- *लगतच्या दोन ग्रामसभांमध्ये ४ महिन्यांपेक्षा जास्त अंतर असू नये.*
- *अनुसूचित क्षेत्रातील ग्रामसभेची नोटीस ग्रामसभेच्या किमान १५ दिवस अगोदर देणे गरजेचे आहे.*
- *सभेच्या नोटीसीमध्ये सभेचे ठिकाण, वेळ व विषय नमूद करणे आवश्यक आहे.*
- *सर्वसाधारणपणे ग्रामसभेचे कामकाज ग्रामपंचायत कार्यालयामध्ये, चावडीमध्ये किंवा सार्वजनिक ठिकाणी केले पाहिजे. ग्रामपंचायतीच्या मुख्य गावातच ग्रामसभा आयोजित केली पाहिजे, परंतु ग्रामपंचायतीच्या कार्यकक्षेत एकापेक्षा अनेक गावे असतील तर इंग्रजी अद्याक्षरानुसार अनुक्रमांक ठरवून त्याप्रमाणे ग्रामसभा घ्यावी.*
- *प्रत्येक ग्रामसभेच्या आदल्यादिवशी ग्रामपंचायतीची बैठक आयोजित करावी लागते.*
- *सरपंचाने ग्रामसभेला पुरेशी प्रसिध्दी द्यावी व जास्तीत जास्त लोक उपस्थित राहतील याची काळजी घ्यावी. ग्रामसभेत चर्चेसाठी येणाऱ्या विषयाबाबत सरपंचांकडे किंवा सचिवाकडे सभेच्या २ दिवस अगोदर तसा प्रस्ताव द्यावा लागतो.*
- *सभेचे कामकाज चालविण्यासाठी व निर्णय कायदेशीर होण्यासाठी ग्रामसभेसाठी जी किमान सदस्यांची उपस्थिती अनिवार्य आहे ती संख्या म्हणजे सभेचा कोरम होत, ह्याला गणपूर्ती असेही म्हणतात. ग्रामसभेच्या कार्यकाळात नियमितपणे गणपूर्तीची आवश्यकता आहे, आवश्यक गणपूर्ती असल्याशिवाय अनुसूचित क्षेत्रातील ग्रामसभेचे कामकाज करता येत नाही.*
- *सर्वसाधारण क्षेत्रातील ग्रामसभेसाठी १५ % किंवा १०० यापैकी जे कमी असेल व अनुसूचित क्षेत्रातील ग्रामसभेसाठी २५ % किंवा १०० या पैकी जे कमी असेल एवढे कोरम सदस्य उपस्थित राहिल्यास गणपूर्ती होते.*
- *अनुसूचीत क्षेत्रातील ग्रामसभेत गणपुर्ती झाल्याशिवाय कोणताही निर्णय घेता येत नाही.*
- *गावाच्या मतदार यादीमधील जे सदस्य ग्रामसभेस उपस्थित राहतील त्यांची स्वाक्षरी अंगठा/हजेरी रजिस्टरमध्ये घ्यावी. तसेच कामकाजाला सहाय्य करणारे जे कर्मचारी - अधिकारी व अन्य आमंत्रित ह्यांच्याही सह्या घेण्यात याव्यात. परंतु मतदाराशिवाय अन्य कोणालाही मतदानाच्या वेळी ठरावाच्या बाजूने किंवा विरुध्द सहभाग घेता येणार नाही.*
- *सर्वसाधारणपणे विषयसूचीतील अनुक्रमाप्रमाणेच सभेचे कामकाज पार पाडले जावे. परंतू सभेमध्ये बहुमताने क्रमवारी बदलण्याचा निर्णय झाल्यास त्याप्रमाणे कामकाज पार पाडावे*
- *ग्रामसभेत विचारलेल्या प्रश्नांना सभाध्यक्षानेच उत्तर देणे आवश्यक आहे. सभाध्यक्षाला एखाद्या प्रश्नाचे उत्तर माहित नसल्यास त्याने माहिती घेवून प्रश्नाचे उत्तर देणे अपेक्षित आहे.*
- *सभेचे ठराव सुस्पष्ट, मुद्देसुद व अर्थपूर्ण असावेत.*
- *सभेचा कार्यवृत्तांत सविस्तर लिहावा व त्या खाली अध्यक्ष व सचिव ह्यांची स्वाक्षरी करावी.*
- *गाव विकासाचे सर्व निर्णय ग्रामसभेत होणार असल्याने ग्रामसभेच्या सर्व सदस्यांनी ग्रामसभेला उपस्थित रहाणे आवश्यक आहे.*
- *प्रत्येक आर्थिक वर्षातील व निवडणूक झाल्यानंतरच्या पहिल्या ग्रामसभेच्या अध्यक्ष सरपंच असतो. जर सरपंच अनुपस्थित असेल तर उपसरपंच व दोघेही अनुपस्थित असतील तर ग्रामसभेने बहुमताने निवडलेला ग्रामपंचायत सदस्य ग्रामसभेचा अध्यक्ष असेल*

*अन्य ग्रामसभेसाठी सभेत उपस्थित असलेल्या सदस्यांनी बहुमताने निवडलेली व्यक्ती ग्रामसभेचा अध्यक्ष म्हणून कामकाज पार पाडील.*

- ✍ *आर्थिक वर्षाच्या पहिल्या ग्रामसभेत मागील वर्षातील खर्च, पुढील वर्षाचे अंदाजपत्रक, लेखाविवरण पत्रे, जमाखर्च वाचून दाखविणे, लेखापरिक्षणाची माहिती देणे ह्या संबंधाने सभेत कामकाज चालते.*
- ✍ *विशेष ग्रामसभा आयोजित करण्यासाठी सरपंचाला पंचायत समिती, स्थायी समिती व मुख्य कार्यकारी अधिकारी आदेश देऊ शकतात.*
- ✍ *अनुसूचित क्षेत्रातील ग्रामसभा स्थगित करता येते परंतु तिच्या ऐवजी घेण्यात आलेल्या ग्रामसभेसाठीही कोरम पूर्ण व्हावा लागतो.*
- ✍ *सभेचे कामकाज तहकूब करता येते. १) सभेस आवश्यक गणपूर्ती नसल्यास. २) सभेमध्ये वादविवाद होऊन सभेचे कामकाज बंद पाडण्याचा प्रयत्न होत असल्यास व सभेचे कामकाज पुढे चालू ठेवणे शक्य नसल्यास कारणे नमूद करुन सभेच्या अध्यक्षाने सभा तहकूब करावी. ३)सदस्यांनी बहुमताने तसा निर्णय घेतल्यास सभेचे कामकाज थांबवावे लागते.*

***ग्रामसभेला का जायचं?***

- *ग्रामसभा गावाच्या विकासाचे व्यासपीठ आहे. ग्रामसभेत तुमचा सहभाग महत्वाचा आहे. गाव विकास योजनांना मंजूरी देण्याचा व गाव विकासाचे सर्व निर्णय ग्रामसभेत होणार असल्याने ग्रामसभेच्या सर्व सदस्यांनी ग्रामसभेला उपस्थित रहाणे आवश्यक आहे.*
- *आपले, आपल्या कुटुंबाचे व गावाचे भविष्य निश्चित करण्यासाठी ग्रामसभेला उपस्थित रहा.*
- *आपला व गावाचा विकास ग्रामसभेच्या माध्यमातून करता येतो. म्हणून ग्रामसभेला उपस्थित रहा व इतरांनाही उपस्थित रहाण्याचा आग्रह धरा.*
- *गाव जडणघडणीत तुमचा वाटा महत्वाचा आहे. गावविकासात सहभागी होण्यासाठी ग्रामसभेला उपस्थित रहाणे आवश्यक आहे.*
- *ग्रामपंचायतीने केलेल्या खर्चाला मान्यता ग्रामसभा देते, पैशाचा योग्य विनियोग होतो किंवा नाही याची खातरजमा करण्यासाठी ग्रामसभेला जाणे आवश्यक.*
- *विकास योजनांना व प्रकल्पांना ग्रामसभेची पुर्व संमती आवश्यक असल्याने गावाचा विकास करण्यासाठी ग्रामसभेला जा.*
- *सरकारी योजनांसाठी लाभार्थी निवड करण्याचा अधिकार ग्रामसभेला आहे. सरकारच्या विविध योजनांचा प्राधान्यक्रम ठरवण्यासाठी ग्रामसभेला जा.*
- *ग्रामसभेच्या मंजुरीशिवाय लाभार्थींची निवड करणे नियमबाह्य आहे.*
- *पंचायतीच्या कार्यक्षेत्रातील एखादा कर्मचारी कामात कसुर करत असेल तर त्याच्या विरुध्द विभागीय चौकशी सुरु करावी असा ठराव ग्रामसभा घेऊ शकते, परंतु ठरावाची अंमलबजावणी राज्यशासनाची मान्यता घेवून करावी लागते.*
- *कामकाजाला मदत होण्यासाठी ग्रामसभेला वेगवेगळ्या समित्या गठित करण्याचा अधिकार आहे. ह्या समित्या महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ कलम ४९ च्या आधारे गठित करण्यात येतात.*
- *वर्षातील पहिल्या ग्रामसभेत पंचायतीच्या जमाखर्चाची माहिती सर्व करदात्यांना ग्रामसभेतून मिळते.*
- *विकास कामे करणाऱ्या सरकारी व खाजगी कार्यालयाच्या कामकाजावर ग्रामसभा नियंत्रण ठेवू शकते, ह्या अधिकाराद्वारे विकास कामाची योग्य अंमलबजावणी करुन घेण्यासाठी ग्रामसभेला उपस्थिती महत्वाची.*
- *गावाचा विकास आराखडा ग्रामसभा मंजुर करते. त्यात तुमचा सहभाग नोंदवण्यासाठी ग्रामसभेला जा.*

- गावाच्या विकासासाठी महत्त्वाच्या समितीचे गठन ग्रामसभेला करण्याचा अधिकार आहे. उदा. वनहक्क समिती, संयुक्त वन व्यवस्थापन समिती, दक्षता व सनियंत्रण समिती.ह्या समित्यांमध्ये सहभाग घेण्यासाठी ग्रामसभेला उपस्थिती असणे आवश्यक.
- ग्रामसभेला जमीनसंपादन व पुर्नवसन याबाबत शिफारस करण्याचा अधिकार आहे. ह्या अधिकाराची अंमलबजावणी करण्यासाठी उपस्थिती असणे आवश्यक.
- आदिवासींची जमीन बिगर आदिवासीला घेता येत नाही. ह्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी ग्रामसभेला जा.
- अनुसूचित क्षेत्रातील ग्रामसभेला आदिवासींच्या प्रथा, परंपरा सामुहिक मालमत्ता, आपापसातील तंटे सोडविण्याची पध्दत ह्यांचे जतन व संवर्धन करण्याचा अधिकार आहे. ह्याबाबत निर्णय घेण्यासाठी ग्रामसभेला जा.
- लघु पाणीसाठ्याचे व्यवस्थापन करण्याचा अधिकार पंचायतीला आहे. ह्या अधिकाराचा वापर करुन गावातील पाण्याचे नियोजन करण्यासाठी ग्रामसभेला जा.
- शासकीय व निमशासकीय कार्यालयाच्या कामकाजावर ग्रामसभेचे नियंत्रण असते. ह्या कार्यालयांच्या कामकाजामध्ये सहभाग घेवून गावाच्या विकासासाठी ग्रामसभेला जा.
- आपला व आपल्या गावाचा विकास देशाचा विकास ठरु शकतो.
- ग्रामसभा नियमित भरवणे व नियमानुसार चालवणे ह्यासाठी आग्रही रहा.
- गावाच्या विकासामध्ये सहभागी होण्यासाठी ग्रामसभेस सर्वांनी उपस्थित रहावे ह्यासाठी प्रयत्न करा.
- मागास व गरीब लोकांना ग्रामसभेत न्याय मिळेल ह्याची खात्री बाळगा.
- ग्रामसभा सर्वांना समान न्याय देईल ह्यासाठी आग्रही रहा.
- सर्वांना मोकळेपणाने व निर्भयतेने ग्रामसभेस सहभाग घेता येईल. यासाठी जागरुक रहा.
- ग्रामसभेच्या अध्यक्षाला सभेचे कामकाज चालवण्यासाठी सहकार्य करा.
- ग्रामसभेमध्ये विकास कामांच्या अमंलबजावणीवर लक्ष ठेवण्याचा अधिकार आहे, हे ध्यानात घ्या.
- ग्रामसभेचे सर्व कामकाज शांततेत व सर्वांच्या सहभागाने पार पडेल ह्यासाठी मदत करा.

***लक्षात ठेवण्यासारखे व महत्वाचे :***

- पेसा कायदा हा आदिवासींचा स्वशासन कायदा आहे.
- लोकसंख्येच्या प्रमाणात ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषदेमध्ये आदिवासीनां प्रतिनिधीत्व देण्यात आले आहे.
- विकास योजना व प्रकल्पांना ग्रामसभेची पूर्व संमती आवश्यक आहे.
- अनुसूचित क्षेत्रातील ग्रामसभेला आदिवासींच्या प्रथा, परंपरांचे, सामुहिक मालमत्ता व तंटे सोडविण्याची पध्दत ह्यांचे जतन व संवर्धन करण्याचा अधिकार आहे.
- केंद्र व राज्य शासनाच्या योजनांकरिता लाभार्थ्यांची निवड करण्याचा ग्रामसभेला अधिकार आहे.
- पंचायतीने केलेल्या खर्चाला मान्यता देण्याचा व उपयोगिता प्रमाणपत्र देण्याचा ग्रामसभेला अधिकार आहे.
- जमिनीचे संपादन व लोकांचे पुनर्वसन करण्यापूर्वी ग्रामसभेची मान्यता घेणे अनिवार्य आहे.
- विकास योजनेला/ प्रकल्पाला मंजूरी देण्याचा व त्यांचा प्राधान्यक्रम ठरविण्याचा ग्रामसभेला अधिकार आहे.
- बाजाराची स्थापना व त्याचे व्यवस्थापन करण्याचा अधिकार ग्रामसभेला आहे.

# अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ आणि नियम २००८

वनहक्क कायदा २००६ अंतर्गत वनहक्क समिती गठित करण्याचा अधिकार ग्रामसभेला आहे.
वनहक्क समिती व्यक्तिगत व सामुहिक वनाधिकाराबाबतचे अर्ज स्विकारते व त्या दाव्याची पडताळणी करुन आपल्या शिफारशीसह पुढील निर्णयासाठी ग्रामसभेपुढे प्रस्ताव ठेवते.

पेसा व वनहक्क कायदा २००६ ने गौण वनउपजेची मालकी गावाकडे सोपविण्यात आली आहे. राज्य शासनाने ३३ प्रकारची वनउपज जाहीर केली आहे. त्यामध्ये मूळ, पाने, फुले, फळे,डिंक, मध, आपटा, तेंदूपत्ता, बांबू, लाख, रेशीमकिडे, गवत अशा प्रकारच्या ३३ बाबींचा समावेश होतो.

केंद्र शासनाला मुख्य व गौण खनिजे जाहीर करण्याचा अधिकार आहे. गौण खनिजांमध्ये दगड, माती, मुरुम, खडी, वाळू यांचा समावेश होतो.

गौण वनउपज गोळा करण्यापासून ते तिची विक्री करेपर्यंत सर्व निर्णय ग्रामसभेला घेता येतील. गौण खनिजांच्या भाडेपट्ट्यास मंजूरी देताना किंवा गौण खनिजाचा लिलाव करण्यापूर्वी ग्रामसभेची मान्यता घेणे बंधनकारक आहे.

**अनुसुचित जमाती व इतर पारंपारीक वन निवासी (वनहक्क मान्य करणे) अधिनियम,२००६**

**व्याख्या:**

१. ''सामुहिक वन साधने म्हणजे ''गावच्या पारंपारीक किंवा रुढीगत सीमांतर्गत असणारी किंवा फिरस्ता आदिवासी समाजाच्या बाबतीत भुप्रदेशाचा तसेच राखीव वनांचा, सुरक्षित वनांचा आणि समाजाला पारंपारीक प्रवेश असणारी अभयारण्ये व राष्ट्रीय उद्याने ह्यासारख्या सुरक्षित क्षेत्रांचा (मोसमी) वापर असणारी रुढीगत सामायिक वनजमीन, असा आहे.
२. ''संकट ग्रस्त वन्यजीवांचे वस्तीस्थान'' म्हणजे सरकारने नियुक्त केलेल्या स्थानिक तंत्राचा अंर्तभाव असणाऱ्या आणि ज्यामध्ये आदिवासी कार्य मंत्रालयाचे प्रतिनिधी देखील अंतर्भुत असतील अशा तज्ञ समितीने विचार विनिमय केल्यावर केंद्र सरकारच्या पर्यावरण व वनीकरण मंत्रालयाने, कलम ४ ची पोट कलमे (१) व (२) च्या कार्यपध्दतीच्या स्वरुपाच्या गरजांमधुन निर्धारीत केलेले अशी क्षेत्रे, निश्चित व अधिसुचित केल्यानुसार वन्य प्राणी संवर्धनाच्या प्रयोजनासाठी, अबाधित ठेवलेली, राष्ट्रीय उद्याने व अभयारण्ये, असा आहे.
३. '' वन निवासी अनुसुचित जमाती'' म्हणजे, मुख्यत्वे करुन वनात राहणारे अनिसुचित जमातीचे सदस्य किंवा समाज, असा आहे आणि त्यामध्ये अनुसुचित जमातीचे फिरस्ता आदिवासी समाज जीवनावर, जे वनांवर किंवा उपजिविकेच्या खऱ्याखुऱ्या गरजांसाठी वनांवर किंवा वन जमिनींवर अवलंबुन असलेला समाज ह्यांचा समावेश होतो.
४. '' वन भुमी '' म्हणजे ,कोणत्याही वनक्षेत्रात येणारी कोणत्याही वर्णनाची जमीन, असा आहे, आणि त्यामध्ये वर्गीकरण न केलेली वने, सीमांकित न केलेली वने, अस्तित्वात असलेली किंवा मानीव वने, सुरक्षित वने,राखीव वने, अभयारण्ये आणि राष्ट्रीय उद्याने ह्यांचा समावेश होतो.
५. '' वनग्राम '' ह्याचा अर्थ , वनीकरणाच्या कामांसाठी कोणत्याही राज्य शासनाच्या वनविभागाद्वारे वनांमध्ये स्थापन केलेल्या किंवा वन आरक्षण प्रक्रियेद्वारे वन ग्रामांमध्ये रुपांतरित केलेल्या वसाहती, असा आहे. आणि त्यामध्ये वन वसाहत ग्रामे, निश्चित मागणीच्या धारण जमिनी, लागवडीसाठी आणि शासनाने परवानगी दिलेल्या इतर वापरांसाठी असलेल्या जमिनींचा अंतर्भाव असलेल्या ग्रामांसाठी ठेवण्यात आलेल्या सर्व प्रकारच्या योग्य वसाहती मग त्याकोणत्याही नावाने ओळखल्या जात असोत ह्यांचा समावेश होता.

**वनहक्क**

## वन निवासी अनुसुचित जमाती व इतर :

ह्या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, सुरक्षित वैयक्तिक किंवा सामुहिक किंवा दोघांचे धारणाधिकार म्हणुन वननिवासी अनुसुचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी ह्यांचे वनहक्क खालील प्रमाणे :-

१) वननिवासी अनिसुचित जमाती किंवा इतर पारंपारिक वननिवासी ह्यांच्या सदस्याने किंवा सदस्यांनी वस्ती करण्यासाठी किंवा स्वत:च्या उपजीविकेकरीता शेती करण्यासाठी वैयक्तिक किंवा सामायिक व्यवसाय म्हणुन वनजमिनी धारण करण्याचा व त्यामध्ये राहण्याचा हक्क.

२) पुर्वीच्या संस्थानामध्ये वापरले जाणारे आणि कोणत्याही नावाने ओळखण्यात येणारे 'निस्तार' सारखे हक्क, जमिनदारी किंवा, अशा मध्यम अवस्थांमधील पध्दती.

३) गावच्या सीमांतर्गत किंवा सीमेबाहेर पारंपारिकरीत्या गोळा केले जाणारे गौण वनोत्पादन गोळा करणे, त्याचा वापर करणे किंवा त्याची विल्हेवाट लावणे यासाठी स्वामित्व हक्क.

४) पाण्यामधील मत्स्य व अन्य उत्पादने, चराई करणे (प्रस्थापित व तात्पुरती अशा दोन्ही स्वरुपाची) पारंपारिक मोसमी साधनसंपत्ती मिळवण्यास भटक्या किंवा फिरस्ता आदिवासी समाजास मुभा असणे ह्या सारखे इतर सामाजिक हक्क असणे किंवा त्यास तो हक्कदार असणे.

५) आदिम जमाती समुह आणि कृषी पुर्व समाज यांच्या निवासाचे व निवास स्थानाचे हक्क

६) सामाजिक धारणाधिकार.

७) जेथे दाव्यांवर विवाद होतात अशा कोणत्याही राज्यातील,कोणत्याही नावाने ओळखले जाणारे विवादास्पद जमिनींवरील किंवा त्या संबंधीतील हक्क

८) वनजमिनीवरील पट्टा किंवा भाडेपट्टा किंवा अनुदान ह्याचे मालकी हक्कांमध्ये रुपांतरण करण्यासाठी,कोणतेही स्थानिक प्राधिकरण किंवा राज्य शासन यांनी दिलेला हक्क.

९) सर्व वनग्रामे,जुनी वसतिस्थाने, भुमापन न केलेली गावे आणि अन्य गावे मग ती महसुली गावे म्हणुन अभिलिखित, अधिसुचित केलेली असोत किंवा नसोत ह्यांची वसाहत करण्याचा हक्क.

१०) निरंतर वापर करण्यासाठी पारंपारिकरित्या संरक्षण व संवर्धन करण्यात आलेल्या कोणत्याही सामाजिक वन स्त्रोताचे संरक्षण, पुननिर्माण, संवर्धन किंवा व्यवस्थापन करण्याचा हक्क.

११) कोणत्याही राज्य विधी अन्वये किंवा स्वायत्त जिल्हा परिषद किंवा स्वायत्त प्रादेशिक परिषद यांच्या विधी अन्वये मान्यता दिलेले हक्क किंवा कोणत्याही राज्याच्या कोणत्याही पारंपारिक किंवा रुढीगत कायद्या खाली आदिवासींचे हक्क स्वीकारलेले हक्क.

१२) जैविक विविधतेत प्रवेश मिळवण्याचा हक्क आणि जैविक विविधता व सांस्कृतिक विविधता हयांच्याशी संबंधित बौध्दिक मालमत्ता व पारंपारिक ज्ञान मिळवण्याचा सामुहिक हक्क.

१३) अनुक्रमांक १ ते ११ मध्ये नमुद न केलेले परंतु वननिवासी अनिसुचित जमाती किंवा यथास्थिती, इतर पारंपारिक वननिवासी ह्यांच्याकडुन उपभोगण्यात येत असलेले, शिकार करणे किंवा जाळयात पकडणे किंवा वन्य प्राण्यांच्या एखाद्या प्रजातीच्या शरीराचा भाग कापुन घेणे या रुढीगत हक्कांखेरीज अन्य पारंपारिक हक्क.

१४) ज्या ठिकाणी अनुसुचित जमाती व इतर (पारंपारिक ) वननिवासी ह्यांना १३ डिसेंबर २००५ पुर्वी त्यांची वैध हक्कदारी डावलुन कोणत्याही स्वरुपाच्या वन जमिनीतुन अवैधरित्या निष्कासित किंवा विस्थापित करण्यात आले असेल तर त्यांचे पर्यायी जमिनीसह मुळ स्वरुपात पुनवर्सन करण्याचा हक्क.

## वनहक्क धारकांची कर्तव्ये

१) वन्य जीवन, वन्य आणि जैविक विविधता यांचे सरंक्षण करणे.

२) लगतची पाणलोट क्षेत्र,जलस्त्रोत व परिस्थितीकी दृष्टया अन्य संवेदनाक्षम क्षेत्र पुरेशी सुरक्षित आहेत ह्याची सुनिश्चिती ठेवणे

३) वननिवासी अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासी यांचे निवासस्थान, त्यांच्या सांस्कृतिक व नैसर्गिक वारसाला कोणत्याही प्रकारे बाधा पोहोचेल अशा, कोणत्याही प्रकारच्या विघातक प्रथांपासुन सुरक्षित ठेवले असल्याची सुनिश्चिती करणे.

४) सामाजिक वनांचे स्त्रोत मिळवण्याच्या मार्गाचे विनियमन करणे आणि वन्य प्राणी,वन व जैविक विविधता ह्यांवर प्रतिकुल परिणाम करणारी कोणतीही कृती थांबविणे यांच्यासाठी ग्रामसभेने घेतेलेल्या निर्णयांचे अनुपालन केले जात असल्याची सुनिश्चिती करणे.

**सामुहिक वन हक्क व्यवस्थापन समिती :**

अनुसुचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वन हक्कांची मान्यता) आधिनियम २००६ नियम २००८ व सुधारित नियम, २०१२ मधील कलम ३ (१) नुसार निरंतर वापर करण्यासाठी पारंपारिक रित्या संरक्षण व संवर्धन करण्यात आलेल्या कोणत्याही सामाजिक वनस्त्रोताचे संरक्षण, पुर्ननिर्माण संवर्धन किंवा व्यवस्थापन व वन व जैविक विविधता ह्यांचे संरक्षण करण्यासाठी ग्रामसभेने ग्रामपंचायत सदस्यामधून स्थापन केलेल्या समितीला सामुहिक वन हक्क व्यवस्थापन समिती (CFRMC ) असे संबोधण्यात येते.

वनहक्क कायद्यातील अधिनियम २००६, नियम २००८ व सुधारित नियम, २०१२ व जनजाती कार्य मंत्रालय, भारत सरकार, यांनी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार सामुहिक वनहक्क व्यवस्थापन समिती ( CFRMC) आपली कर्तव्ये व जबाबदाऱ्या पार पाडेल.

**सामुहिक वन हक्क व्यवस्थापन समिती (CFRMC ) कामे:**

ग्रामसभेतील सामूहिक वन संपत्तीचे संवर्धन व व्यवस्थापन योजना तयार करणे, नैसर्गिक साधन संपतीच्या व्यवस्थापनातून प्राप्त होणारा महसूल तसेच शासनाकडून प्राप्त होणारा निधी यांचे बँक खात्यामार्फत संनियंत्रण करणे, जमा खर्चाचे लेखा व लेखा परीक्षण ठेवणे इ. प्रशासकीय बाबीं पार पाडण्याकरिता सदर समिती ही वनहक्क कायद्याच्या अंमलबजावणीसाठी ग्रामसभेची कार्यकारी समिती असेल. सामुहिक वन हक्क व्यवस्थापन समितीचे संनियंत्रण व नियंत्रण ग्रामसभा करेल.

**४)सामुहिक वन हक्क व्यवस्थापन समितीसाठी वनहक्क कायद्याच्या अंमलबजावणीसाठी सहाय्यकारी मार्गदर्शक सूचना:-**

१. सामुहिक वन हक्क व्यवस्थापन समिती ही ग्रामसभेतील वनहक्क धारकांमधून सर्व वनहक्क धारकांचे प्रतिनिधीत्व करणारी समिती असेल. त्यामध्ये किमान ५ व कमाल ११ सदस्य असावेत. बैठकीची गणपूर्ती सर्व सदस्य संख्येच्या अर्ध्यापेक्षा कमी नसतील इतक्या सदस्य संख्येने होईल परंतु उपस्थित सदस्यांच्या किमान एक -तृतीयांश इतक्या महिला असतील.
२. सामुहिक वन हक्क व्यवस्थापन समिती त्यांच्या सदस्यांमधून एक अध्यक्ष , एक सचिव व एक खजिनदार यांची बहुमताने निवड करेल. यापैकी एक पदाधिकारी महिला असेल, अध्यक्ष हा अनुसूचित जमातीचा असावा.
३. सामुहिक वन हक्क व्यवस्थापन समितीच्या बैठकीची सूचना अध्यक्ष/सचिव यांचे स्वाक्षरीने निर्गमित करतील.
४. सामुहिक वन हक्क व्यवस्थापन समितीची तातडीची बैठक बोलावयाची झाल्यास गावांमध्ये ड्रम वाजवून / दवंडी अर्धा तास अगोदर देण्यात यावी.
५. मागील झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तास सचिव मान्यता घेतील तसेच इतिवृत्तातील मुद्यांवर केलेल्या कार्यवाहीची सदस्यांना माहिती देतील.

**५)सामुहिक वन हक्क व्यवस्थापन ( CFRMC) समितीची जबाबदाऱ्या :-**

१) अधिनियम २००६ मधील कलम ५ मध्ये दर्शविलेली कर्तव्ये ग्रामसभेच्या मान्यतेने पार पाडणे.

२) अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी ह्यांच्या फायद्यांसाठी ग्रामसभेच्या मान्यतेने सामुहिक वन संपत्तीचे निरंतर व समसमान व्यवस्थापन करण्यासाठी नियम ४ (१) (च) मधील तरतूदीनुसार सामुहिक वन संपत्तीचे संवर्धन करण्याची व तिचे व्यवस्थापन करण्याची योजना तयार करणे.

३) वन विभागाच्या सूक्ष्म योजना, चालू योजना (Working Plan) किंवा व्यवस्थापन योजनांबरोबर अशा संवर्धन व व्यवस्थापन योजनांचे, समितीला आवश्यक वाटेल अशा फेरबदलांनिशी एकत्रीकरण करणे.

४) सामुहिक वनहक्क व्यवस्थापन समितीच्या क्षेत्रातील वन व्यवस्थापन, जमीन आणि पाणी ह्यांचा परिणामकारक आराखडा तयार करणे.

५) कायद्याचे उल्लंघन होऊ नये आणि त्याची अंमलबजावणी खात्रीशीर होण्यास ग्रामसभेच्या मान्यतेने आणि वनहक्क कायद्याशी सुसंगत अशी नियमावली करणे.

६) वाहतूक परवाना, उत्पादनांच्या विक्री पासूनचे उत्पन्न किंवा व्यवस्थापन आराखड्यात बदल करण्याशी संबंधित सर्व निर्णयांना मान्यता देणे.

७) केंद्र शासनाने १२ गौण वनोपजाची किमान आधारभूत किंमती (MSP) आधारे खरेदीची यंत्रणा राज्यात स्थापन करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत. त्यानुसार समितीने वनोपजाची किमान आधारभूत किंमती पेक्षा कमी दराने विक्री होणार नाही ह्याची दक्षता घेणे.

८) ग्रामसभेतील नैसर्गिक साधन संपत्तीच्या व्यवस्थापनातून प्राप्त होणारा महसूल तसेच शासनाकडून प्राप्त होणारा निधी याचे बँक खात्यामार्फत संनियंत्रण करणे.

९) वनहक्कांशी संबंधित कामे, खर्चाचे अंदाजपत्रक तयार करणे व त्यास ग्रामसभेची मान्यता घेणे.

१०) ग्रामसभेचे निर्देश व निर्णयानुसार कामे करणे.

११) कामाची प्रगती , निधी इतर बाबतीत ग्रामसभेला अहवाल सादर करणे.

१२) समितीचे सर्व दप्तर व अनुषंगीक कागदपत्रांचे जतन करणे व जमा खर्चाचे लेखे ठेवणे .

१३) वनहक्क कायदा शासन निर्णय आणि धोरणाचे वाचन करुन ग्रामसभेला महिती देणे अथवा प्रशिक्षण देणे

१४) सामुहिक वन जैविक विविधता यांचे रजिस्टर अद्यावत ठेवणे आवश्यक

१५) समितीने लेखे हाताळणे , समितीच्या बॅक खात्याच्या ग्रामसभेच्या ठराव घेऊन निधी काढणे

१६) समितीने हाती घेतलेल्या व पुर्ण केलेल्या कामांचा तपशील ग्रामसभेमध्ये बोर्डावर दाखवणे

१७) समितीने केलेल्या कामांचा फोटोग्राफ व इतर दस्ताऐवज ग्रामसभेमध्ये ठेवणे.

## शासन योजना

## आदिवासी विकास विभाग , महाराष्ट्र शासन

**१) केंद्रीय अर्थसंकल्प (न्यूक्लिअस बजेट) योजना**
(शासन निर्णय क्र.न्युबयो-२०११/प्र.क्र.८७/का.७,दि.२१/०६/२०१३.)

ही योजना शासनातर्फे सन १९८१-१९८२ पासून प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प आणि आयुक्त आदिवसी विकास यांच्या नियंत्रणाखाली राबविण्यात येत आहे.

**योजनेचा उद्देश :-** ज्या योजना आदिवासी विकास किंवा कल्याणाच्या दृष्टीने स्थलकालानुरुप आवश्यक आहेत, आणि ज्या योजनांचा समावेश अर्थसंकल्पात नाही, अशा अभिनव स्वरुपाच्या स्थानिक महत्वाच्या योजना तांत्रिक औपचारिकतेमुळे दिर्घ कालावधीकरिता अडकून न पडता स्थानिक पातळीवर



**वन हक्क समितीकडून अर्जाची पोहोच पावती घ्यावी**

तातडीने आणि प्रभावितपणे कार्यान्वित करुन त्यांचा लाभ गरजू आदिवासींना प्रत्यक्ष मिळवून देणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे.

न्युक्लिअस बजेट योजनांचे खाली द्रशविल्याप्रमाणे ३ प्रमुख गट पाडण्यात आलेले आहेत.

गट अ - उत्पन्न निर्मितीच्या किंवा उत्पन्न वाढीच्या योजना

गट ब - प्रशिक्षणाच्या योजना / कौशल्या विकास कार्यक्रम

गट क - मानव साधन संपत्ती विकासाच्या व आदिवासी कल्याणात्मक योजना

न्युक्लिअस बजेट योजने अंतर्गत गट निहाय आर्थिक मर्यादा पुढीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | योजनेचा गट | आर्थिक वर्षात प्राप्त तरतुदीच्या |
|---|---|---|
| १ | अ | ५० टक्के |
| २ | ब | २५ टक्के |
| ३ | क | २५ टक्के |

न्युक्लिअस बजेट योजने अंतर्गत प्रत्येक आदिवासी व्यक्तीस / कुटुंबास लाभाची आर्थिक मर्यादा रु. ५०,०००/- आहे. ह्या योजनेंतर्गत २ किंवा ३ त्यापेक्षा अधिक आदिवासी लाभार्थी एकत्र आले तर सामूहिक प्रकल्प / कार्यक्रम सुध्दा मंजूर करता येतात परंतु अशा प्रकल्पात एकूण कमाल मर्यादा रु. ७,५०,०००/- राहील

न्युक्लिअस बजेट योजनेंतर्गत कार्यक्रम मंजुरीचे वित्तीय अधिकार खालील प्रमाणे असतील

| अ.क्र | लाभार्थी/ योजना | प्रति प्रकल्प योजना कमाल | मंजुरी देणारे सक्षम अधिकारी |
|---|---|---|---|
| १ | वैयक्तिक किंवा सामूहिक लाभाच्या योजना.(प्रत्येक गटासाठी एकूण मंजूर तरतुदीच्या कमाल २५ टक्के रक्कम ऐवढ्या परंतू कमाल रु. ५.०० लक्ष प्रतिगट योजनांना प्रकल्प अधिकारी मान्यता देतील आणि त्यापेक्षा जास्त रक्कमेच्या योजनांना प्रकल्प अधिकारी यांनी मंजुरी देऊ नये) | ५,००,०००/- | प्रकल्प अधिकारी, ह्यांचे अध्यक्षतेखाली निर्देश समिती |
| २ | वैयक्तिक किंवा सामूहिक लाभाच्या योजना विकास यांच्या अध्यक्षते खालील निर्देशन समिती | २०,००,०००/- | अप्पर आयुक्त, आदिवासी |
| ३ | रु. २०,००,०००/- पेक्षा जास्त रकमेच्या वैयक्तिक किंवा सामूहिक योजना | ४०,००,०००/- | आयुक्त, आदिवासी विकास |
| ४ | रु. ४०,००,०००/- पेक्षा जास्त खर्चाच्या वैयक्तिक किंवा सामूहिक योजना | ---- | सचिव, आदिवासी विकास विभाग |

न्युक्लिअस बजेट योजनेंतर्गत योजना राबविण्यासाठी प्रत्येक प्रकल्पास स्वतंत्र निर्देश समितीची निर्मिती करण्यात आली आहे. सदर समितीचे प्रकल्पस्तर व अप्पर आयुक्तस्तर असे दोन१०स्तर आहेत. प्रकल्प अधिकारी हे प्रकल्प स्तरीय निर्देश समितीचे तर अप्पर आयुक्त हे अप्पर आयुक्त स्तरीय निर्देश समितीचे अध्यक्ष आहेत.

### २) ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा एकात्मिक कार्यक्रम

*संदर्भ : शासन निर्णय क्र.:- टिएसपी११ - २००४/प्र.क्र.२३/क.१४, दि.०३.०६.२००४*

*शासन निर्णय क्र :- आवसु -२००६/प्र.क्र१४/का.१४,दि.०२.०२.२००६*

***योजनेचा उद्देश :*** *सामाजिक न्याय विभागातर्फे राबविण्यात येणाऱ्या दलित वस्ती कार्यक्रमाच्या धर्तीवर शासनाने ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा एकात्मिक कार्यक्रम ह्या योजनेला मंजुरी दिली असून ही योजना २००४-२००५ पासून राबविण्यात येत आहे. ह्या कार्यक्रमांर्गत आदिवासी गावांना/वस्त्यांना सामूहिक विकासाच्या सुविधा तसेच वैयक्तिक /कौंटुबिक तथा सामुहिक लाभाच्या योजना राबविल्या जातात.*

***योजनेची माहिती :*** *आदिवासी वस्ती सुधारणा कार्यक्रमात प्रामुख्याने आदिवासींना विविध प्रकारच्या सुविधा उपलब्ध करुन देणे, ग्राम स्वच्छता अभियान राबविणे इत्यादी बाबींचा समावेश आहे.*

*ग्रामीण विद्युतीकरण ११, मार्गदीप वसविणे, पिण्याच्या शुध्द पाण्याची सोय करणे, आरोग्य विषयक जनजागृती, जोडरस्ते, अंतर्गत रस्ते, ग्राम सफाई, शिक्षणविषयक सोयी, समाज मंदिरे, घरकुल बांधणे इत्यादी सुविधा शासनाच्या विविध प्रशासकीय विभागामार्फत राबविण्यात येतात.*

*ह्या योजनेसंबंधी एकछत्री कार्यप्रणाली असावी म्हणून हा कार्यक्रम आदिवासी विकास विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या मागासवर्गीयाचे कल्याण ह्या उपविकास शिर्षकाखाली अंतर्भूत केलेला असून त्यांची अंमलबजावणी व संनियत्रणाची जबाबदारी प्रकल्प अधिकाऱ्याची राहील. ह्या योजनेच्या पर्यवेक्षणाची जबाबदारी संबंधित अप्पर आयुक्त, आदिवासी विकास ह्यांचेवर राहील, तर या योजनेवर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक ह्यांचे थेट नियंत्रण असेल.*

### ३) नवसंजीवन योजना

*(संदर्भ : शासन निर्णय क्र.टिएसपी १०९५/प्र.क्र.६/कार्यासन - ६, दि.२२जून १९९५)*

*आदिवासी लोकांसाठी असलेल्या पाणी पुरवठा, आरोग्य सुविधा इत्यादी सारख्या निरनिराळ्या योजनांची एकात्मिकपणे व समन्वयाने अंमलबजावणी करणे आणि त्यांना बळकटी देणे हे नव संजीवन योजनेचे उद्दिष्ट आहे.*

*नव संजीवन योजनेमध्ये खालील योजनांचा समावेश करण्यात आलेला असून त्याची एकाच अधिपत्याखाली अंमलबजावणी करण्यात येत आहे.*

***१. रोजगार कार्यक्रम :***

*अ) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना*

***२. आरोग्य सेवा :***

*अ) प्राथमिक आरोग्यविषयक सुविधांची तरतूद करणे*

*ब) शुध्द व स्वच्छ पिण्याचे पाणी पुरविणे*

***३. पोषण कार्यक्रम:***

*अ) एकात्मिकृत बालविकास योजना*

*ब) शुध्द पोषण कार्यक्रम*

**४. अन्नधान्याचा पुरवठा:**

अ) रास्त भावाच्या दुकानामार्फत अन्नधान्याचे वितरण

ब) सुधारित सार्वजनिक वितरण पध्दती

क) द्वार वितरण पध्दती

**५. धान्य बँक योजना:**

नवसंजीवन योजनेची आदिवासी उपयोजना क्षेत्र, अतिरिक्त आदिवासी उपयोजनाक्षेत्र, मिनीमाडा क्षेत्रखंड आणि राज्यातील क्षेत्रखंड यामध्ये अंमलबजावणी करण्यात येत आहे.

नवसंजीवन योजनेचे मुख्य अंमलबजावणी अधिकारी जिल्हा अधिकारी असून जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी व एकात्मिककृत आदिवासी विकास प्रकल्पाचे (आय.टी.डी.पी.) प्रकल्प अधिकारी नवसंजीवन योजनेच्या यशस्वी व प्रभावी अंमलबजावणीसाठी मदत करतात.

नवसंजीवन योजनेअंतर्गत निश्चित करावयाच्या जोखमीची/ संवेदन क्षेत्र/क्षेत्रखंड गावे ठरविताना विचारात घ्यावयाची मानके :

अ) अलीकडेच दुर्गम म्हणून घोषित करण्यात आलेली गावे

ब) गतकाळात ज्या गावांमध्ये क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणावर कुपोषण झाले आहे ती गावे

क) पावसाळ्यात दळणवळणाचा संपर्क तुटणारी गावे

ड) ज्या गांवामध्ये शुध्द आणि स्वच्छ पाण्याचा पुरवठा होत नाही अशी गावे

ई) प्राथमिक आरोग्य केंद्र आणि उपकेंद्रापासून खूप लांबवर असलेली गावे

फ) ज्या गावांमध्ये रास्त भाव दुकाने नाहीत अशी गावे किंवा अशा रास्त भावाच्या दुकानाच्या ठिकाणापासून लांब असलेली गावे


ग) पावसाळ्यात ज्या गावांमध्ये रोजगार मिळणे अवघड काम असते अशी गावे

ह) एकात्मिक बालविकास योजनेअंतर्गत ज्या गावांमध्ये अंगणवाड्या नाहीत अशी गावे

**स्वच्छ महाराष्ट्र स्वास्थ महाराष्ट्र चंद्रपूर जिल्ह्यातील जिवती तालुक्यातील अमरावती जिल्ह्यातील धारणी आणि चिखलदरा तालुक्यातील आदिवासी समुदायाची जीवनशैली व आरोग्य /पोषण /उपजिविका संसाधन सद्यस्थिती अभ्यास कौटुंबिक सामाजिक व आर्थिक सर्वेक्षण (Baseline Survey ), गाव निहाय समुदायनिहाय गट चर्चा (FGD ), गावनिहाय प्रकल्पातील प्रमुखशासकीय / निमशासकीय यंत्रणा तसेच प्रमुख व्यक्तीशी वार्तालाप (Key Informant's Interviews )**





















## पेसा कायदा लागू असलेले महाराष्ट्रातील जिल्हे

